N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** बंडगार्डन
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0375 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/11/2025 10:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 21/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/11/2025
**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/11/2025 **Time (वेळ):** 09:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 015
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/11/2025 09:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.800 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** विभागीय शिक्षण उपसंचालक ,कार्यालय, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** संजय हरीराम सोगटे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | तांदुळवाडी, ता वाळवा, ,जि सांगली,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | तांदुळवाडी, ता वाळवा, ,जि सांगली,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9518749010

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | रावसाहेब भागवत मिरगणे | | | 1. ग्रिन व्हिल, डिपी रोड, ए2-, 808, मावळा हटेलजवळ, हडपसर, ,पुणे,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी प्रसाद माणिक लोणारे, वय-51, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9923444998

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 17/11/2025 रोजी 16.15 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री संजय हरीराम सोगटे, वय 55 वर्षे, रा. मु.पो. तांदुळवाडी, ता वाळवा, जि सांगली यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. श्री. दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तात्काळ आम्हाला सदर कारवाई करीता नगर भुमापक या विभागाचे पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. त्यानंतर तक्रारदार यांना आम्ही आमचे कक्षात बसविले थोडयाच वेळात नगर भुमापक विभागाचे श्री. रमेश मारुती पाटील, वय 37 वर्षे, पद - परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी क्रं 1, पुणे रा. 566/13 श्री समर्थ सोसायटी, वास्तुनगर, बिबवेवाडी, पुणे 37 व श्री. जब्बार अजीज सय्यद, वय - 45 वर्षे, पद - परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी क्रं 1, पुणे रा. युनीटी पार्क को ऑपरेटीव्ह सोसा. स.नं. 43, कोंढवा खुर्द, पुणे हे लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे येथे हजर झाल्यानंतर आम्ही नमुद पंच यांना आमची ओळख करुन देऊन तक्रारदार व पंचांची एकमेकांसोबत ओळख करुन दिली. नमुद पंच यांना तक्रारदार श्री. संजय हरीराम सोगटे यांची लोकसेवकाविरुध्द तक्रार असुन आपण सदर कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात का? असे विचारले असता दोन्ही पंचानी कारवाई करीता पंच म्हणुन काम करण्यास होकार दिला. नमुद कारवाई करीता पंच क्रं 1 म्हणुन श्री. रमेश मारुती पाटील, वय 37 वर्षे, पद – परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी क्रं 1, पुणे रा. 566/13 श्री समर्थ सोसायटी, वास्तुनगर, बिबवेवाडी, पुणे हे व पंच क्रं 2 श्री. जब्बार अजीज सय्यद, वय – 45 वर्षे, पद – परिरक्षण भुमापक, नगर भुमापन अधिकारी क्रं 1, पुणे रा. युनीटी पार्क को ऑपरेटीव्ह सोसा. स.नं. 43, कोंढवा खुर्द, पुणे हे काम पहातील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार सोगटे यांना आम्ही दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतली त्यांनी ती कथन केली ती खालीलप्रमाणे.

"मी वरीलप्रमाणे असुन, माझी पत्नी सौ. माया वसंत सदाकळे या श्रीनाथ विदयालय, बोरगाव, ता. माळशीरस, जि. सोलापुर येथे सहशिक्षिका या पदावर सन 2016 पासुन काम करते. माझ्या पत्नीस शालार्थ आयडी नसल्याने आजपावेतो विनावेतन काम करीत आहे. माझ्या पत्नीला शालार्थ आयडी मिळणेकामीचा प्रस्ताव मी दि. 16/06/2025 रोजी शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडे सादर केला होता. माझ्यासोबत माझ्या तालुक्यातील इतर 06 शिक्षकांनी त्यांचे शालार्थ आयडी मिळणेकरीता प्रस्ताव सादर केला होता. त्यांना टप्याटप्याने शालार्थ आयडी मिळालेले असुन त्यांना पगारही सुरु झालेले आहे. अदयाप माझ्या पत्नीस शालार्थ आयडी न मिळाल्याने पगार मिळत नाही. त्यासंदर्भात मी दि. 04/11/2025 रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथील श्री मिरगणे साहेब शिक्षण उपनिरीक्षक यांना भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी मला शालार्थ आयडी देणेकरीता 1 लाख रुपयांची मागणी केली होती. माझ्याकडे पैसे नसल्याने त्यांचेसोबत काहीएक चर्चा न करता निघुन गेलो.

दिनांक 16/11/2025 रोजी त्यांचे कार्यालयातील श्री शिंदे, लिपीक यांनी त्यांचा मो.क्रं. 8668677562 यावरुन माझ्या मो.क्रं. 9518749010 यावर व्हॉटसअॅप कॉल करुन उदया तुम्हाला मिरगणे साहेबांनी भेटण्यास बोलावीले आहे असा निरोप दिला. यावरुन माझी खात्री झाली की, मिरगणे साहेब यांना 1 लाख रुपये दिल्याशिवाय ते माझ्या पत्नीचा शालार्थ आयडी देणार नाही. अशी माझी खात्री झाल्याने आजरोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे त्यांचेविरुध्द तक्रार देणेसाठी आलेलो आहे. मिरगणे साहेब यांनी मागणी केलेली रक्कम हि कोणतीही शासकीय फि नसुन त्यांनी मागीतलेली रक्कम हि लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली असुन सदर लाच रक्कम मला त्यांना दयायची इच्छा नाही. तसेच माझे व मिरगणे साहेब यांचे कोणतेही आर्थीक वादविवाद

नाहीत. तरी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे." अशी तक्रार कथन केली. त्यानंतर नमुद तक्रार तक्रारदार यांनी त्यांचे हस्ताक्षरामध्ये पंचांसमक्ष लिहुन दिली. व त्यावर दोन्ही पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन सही केली. ती वेळ दुपारी 17.30 वा ची होती. सदर कारवाई करणेबाबत तक्रारदार यांचे पत्नीने संमतीपत्र दिलेले आहे. लोकसेवक श्री.मिरगणे यांचे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे हे लाप्रवि कार्यालयापासुन साधारणपणे 01 कि.मी. अंतरावर असल्याने पुढील कारवाई लाचलुचपत विभागाच्या कार्यालयातुनच करणेबाबत आम्ही ठरविले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व एक पॅकबंद मायक्रो एस.डी.कार्ड समक्ष हजर केले व त्याबाबची पंचाना माहीती देवुन मायक्रो एस.डी.कार्डचे सिलबंद पॅकिंग उघडुन दाखविले असता ते सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजुस च्डदक़्त्म्त्त् छथ्घ्द्धड्ड ग्त्ड्द्धदृ च्क् क्तक् क्ष् असे व मागील बाजुस 5024ज्र्ज्र्4020च्र्च् एग् ग्त्र्क़्क क्ष्ग् क्तक्ष्ग्त्र् असे असल्याचे दिसून आले. त्यामध्ये पुर्वीचे कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रीत नसल्याची आम्ही पंचाची व तक्रारदार यांची खात्री करुन दिली. त्यानंतर त्यामध्ये प्रथम तक्रारदार श्री संजय हरीराम सोगटे यांचे व त्यानंतर पंच क्रं 1 म्हणुन श्री. रमेश मारुती पाटील व पंच क्रं 2 म्हणुन श्री. जब्बार अजीज सय्यद यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ होती 17.45 वाजेची होती. आम्ही तक्रारदार, सापळा पथक व दोन्ही पंचास पुढील पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सूचना दिल्या व व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह पंच क्रं 2 यांची दुचाकी क्रं एमएच 12 यु व्हि 0586 वरुन रवाना केले ती वेळी 17.54 वा. ची होती. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 पाटील हे लाप्रवि, पुणे कार्यालयातील आमचे कक्षात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 18.27 वा. ची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, "मी व पंच क्रं 1 पाटील असे पंच क्रं 2 यांचे दुचाकी वाहन क्रं एमएच 12 यु व्हि 0586 यावरुन शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे गेलो. त्यावेळी लिपीक श्री शिंदे काही इसमांसोबत चर्चा करीत थांबले असल्याने आम्ही त्यांचे बाजुला थांबलो. त्यावेळी मी पंच क्रं 1 पाटील यांना इशा-याने हे श्री शिंदे, लिपीक असल्याचे सांगीतले. त्यानंतर लोकसेवक शिंदे हे मला "माझ्यापाशी काही काम नाही तुमच आता, त्यांना तुम्ही भेटल पाहिजे ना एवढा उशीर" असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना "कुणाला" असे विचारले. त्यावर ते मला "मिरगणे साहेबांना" असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना "मिरगणे साहेबाला.... भेटतो." असे म्हणुन मी व पंच क्रं 1 पाटील, लोकसेवक मिरगणे यांना भेटण्यासाठी त्यांचे कक्षाजवळ गेलो. त्यावेळी मी पंच क्रं 1 पाटील यांना लोकसेवक मिरगणे यांचेकडे इशारा करत तेच लोकसेवक मिरगणे असलेबाबत सांगीतले. त्यानंतर मी लोकसेवक मिरगणे यांना भेटलो व मी त्यांना "शिंदे सरांचा फोन आलता, उशीर झाला, वाहन मिळाले नाही" असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक मिरगणे यांनी मला शिंदे यांना बोलवुन आणण्यास सांगीतल्याने मी शिंदे यांना बोलाविण्यास गेलो त्यावेळी कार्यालयीन वेळ संपल्याने मिरगणे साहेब हे त्यांचे कक्षाच्या बाहेर निघुन बाहेर थांबले होते. त्यानंतर शिंदे सुध्दा तिथे आले व मिरगणे साहेबांनी मला "सदाकळे ना" असे विचारले. त्यावर मी त्यांना "होय सदाकळे" असे म्हणाले व "साहेब चार दिवस रजेवर गेले आहे, असे म्हणुन शुक्रवारी सकाळी लवकर या" असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच क्रं 1 पाटील असे सदर ठिकाणाहुन निघुन दुचाकी वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालात परत आलो. अशी हकिकत पंच क्रं 2 यांचेसमक्ष सांगीतली. लोकसेवक मिरगणे यांनी तक्रारदार यांना दिनांक 21/11/2025 रोजी भेटण्यास बोलाविल्याने पुढील कारवाई दिनांक 21/11/2025 रोजी करण्याचे आम्ही ठरविले. त्याअनुशंगाने आम्ही पंचांना, तक्रारदार यांना गोपनियतेची सुचना देऊन पडताळणी कारवाइ तात्पुरती स्थगीत केली व पथकास दि. 21/11/2025 रोजी सकाळी 09.45 वा हजर राहणेबाबत सुचना दिली. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दिनांक 21/11/2015 रोजी तक्रारदार संजय हरीराम सोगटे, पंच व पथक असे सकाळी 09.45 वा लाप्रवि कार्यालयात हजर झाले. व पुढील कारवाई ही आमचे कक्षामध्ुनच करण्याचे आम्ही ठरविले. दि. 17/11/2025 रोजी पडताळणी कारवाईनंतर लिफाफयामध्ये सिलबंद सुरक्षीतरित्या ठेवलेले मेमरीकार्डचा लिफाफा सिलबंद असल्याबाबत आम्ही पंचांची खात्री करुन दिली व तेच मेमरीकार्ड पुढील कारवाई करीता वापरण्याचे आम्ही ठरविले. त्यानंतर आम्ही प्रथम तक्रारदार व त्यानंतर दोन्ही पंच यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन व्हाईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये 10.18 वा. ध्वनीमुद्रीत केले व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार संजय हरीराम सोगटे यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह दुचाकी क्रं एमएच 12 यु व्हि 0586 वरुन रवाना केले ती वेळी 10.56 वा. ची होती. थोडावेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 पाटील हे लाप्रवि, पुणे कार्यालयातील आमचे कक्षात आले ती वेळ 11.13 वा.ची होती. आम्ही तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार संजय

हरीराम सोगटे यांनी सांगीतले की, आम्ही शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे गेलो तेथे  शिंदे लिपीक उपस्थित नसल्याने मी सदर ठिकाणी उपस्थित असलेल्या कर्मचारी यांना मोरे साहेबांबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला "साहेब अजुन नाही आले" असे सांगीतले. आम्ही कार्यालयातुन बाहेर पडत असताना तेथील महिला शिपाई यांना मी मोरे साहेबांबाबत विचारणा केली. त्यावर त्या मला मोरे साहेब सोमवारी येणारे आहे असे सांगीतले. त्यानंतर मी त्यांना मिरगणे साहेबांबाबत विचारणा केली असता, त्यांनी मला मिरगणे साहेब येऊन मिटींगला गेले असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी व पंच कार्यालयामधुन बाहेर मोकळ्या ठिकाणी आलो व शिंदे, लिपीक यांनी मला मिरगणे साहेब यांची भेट घेण्याबाबत निरोप दिला असल्याने मी माझा मो.क्रं. 9518749010 यावरुन लिपीक श्री शिंदे यांचा मो.क्रं. 7083540909 यावर मी दोन वेळेस त्यांना फोन केला परंतु त्यांचा फोन व्यस्त असल्याने त्यांचेसोबत बोलणे झाले नाही. लोकसेवक श्री. मिरगणे हे कार्यालयत उपस्थित नसल्याने  मी व पंच क्रं 1 पाटील असे सदर ठिकाणाहुन निघुन दुचाकी वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यायलात परत आलो. अशी हकिकत पंच क्रं 2 यांचेसमक्ष सांगीतली.

एकंदरीत पंचांसमक्ष झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक मिरगणे, शिक्षण उपनिरीक्षक, शिक्षण उपसंचालक, पुणे हे मिटींगला बाहेर गेले असल्याने दुपारनंतर पडताळणी करण्याचे आम्ही ठरविले. आम्ही तक्रारदार यांना मिरगणे साहेब यांच्या मोबाईल क्रमांकाबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचेकडे मोबाईल क्रमांक असलेबाबत सांगीतले. त्यावेळी मिरगणे साहेब यांना फोन करुन भेटण्याबाबत बोलणे करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 9518749010 यावरुन लोकसेवक मिरगणे यांचा मो.क्रं. 9422461293 यावर फोन केला असता लोकसेवक मिरगणे यांनी तक्रारदार यांचा फोन कॉल कट करुन "क्ष्'थ्थ् ड्ड्थ्थ् न्ऱ्दृद्ध डड्डत्त्" असा टेक्स्ट मेसेज पाठविला. ती वेळ 13.12 वा ची होती. त्यानंतर लोकसेवक मिरगणे यांचा फोन कॉल आल्यानंतर पुढील कारवाई करण्याचे आम्ही ठरविले व सर्वांना लाप्रवि, पुणे कार्यालयात थांबुन राहणेबाबत सुचना दिली. बराचवेळ लोकसेवक मिरगणे यांनी स्वत:हुन कॉल न केल्याने आम्ही लोकसेवक मिरगणे यांना पुन्हा फोन करुन ते कार्यालयात येणार आहेत अगर कसे?ं याबाबत पुन्हा फोन करुन पडताळणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचा मो.क्रं. 9518749010 यावरुन लोकसेवक मिरगणे यांचा मो.क्रं. 9422461293 यावर फोन करुन विचारणा केली असता लोकसेवक मिरगणे हे तक्रारदार यांना " मिटींगलाय मी बाहेर" असे बोलुन फोन कट केला. ती वेळ 13.51 वा ची होती. त्यानंतर लोकसेवक मिरगणे यांचे कार्यायलात दुपारी 15.00 वा नंतर प्रत्यक्ष जावुन पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आल्याने आम्ही दुपारी पडताळणी कारवाईच्या अनुशंगाने तक्रारदार, पथकास व पंचांना योग्य त्या सुचनांची उजळणी करुन दिली व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह दुचाकी क्रं एमएच 12 यु व्हि 0586 वरुन रवाना केले ती वेळी 15.10 वा. ची होती.  काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 पाटील हे आमचे कक्षात आले ती वेळ 15.30 वा.ची होती. आम्ही तक्रारदार संजय हरीराम सोगटे यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, "मी व पंच क्रं 1 पाटील असे पंच क्रं 2 यांचे दुचाकी वाहन क्रं एमएच 12 यु व्हि 0586 वरुन शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे गेलो. केबीनमध्ये मिरगणे साहेब व काही इसम बसले होते. त्यावेळी मी त्यांना "साहेब आत येऊ का" अशी विचारणा केली. त्यावेळी त्यांनी मला उजव्या हाताने थांबण्याचा इशारा करत लागलीच हाताच्या एका बोटाने एकटयालाच आतमध्ये येण्याचा इशारा केला, त्यामुळे पंच पाटील हे मिरगणे साहेब यांच्या केबीनच्या दरवाज़ाजवळ थांबुन राहिले. त्यानंतर त्यांचे केबीनमध्ये असलेले इसम बाहेर निघुन गेले. मी आत गेल्यानंतर आमच्या दोघांमध्ये माझ्या पत्नीचा शालार्थ आयडीबाबत चर्चा सुरु असताना लोकसेवक मिरगणे साहेब मला "नाय मग तुम्ही साहेबांच करणार आहे का काय? एक नंबर असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "करतो, काय तुम्ही सांगा ना..." असे म्हणालो. त्यानंतर लोकसेवक मिरगणे मला "आता ज्या लोकांची काम झालीएत ना, सगळ्यांनी एक-एक लाख रुपये दिलेत.." असे म्हणाले. व "रयत-रयत मधला, कुठलाबी विचारा, जेवढी सात झाली, मध्ये पुन्हा आमच्या भावाने एक सांगीतल, टेंभुर्णीच, राऊळगावच, चौधरी मॅडमच सगळ्यांनी एक-एकच केल" असे म्हणाले.यावर मी "एक-एक लाख रुपये" असे म्हणालो व "माझ्याकडन किती?" अशी विचारणा केली असता, लोकसेवक मिरगणे मला "मंग तुम्हाला सांगा म्हणतोय की" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "एक लाख एवढ न्हाय घडायच माझ्याकडन, जरा कमी काहीतरी" असे म्हणुन विनंती केली. त्यानंतर मी त्यांना " दहा हजार काहीतरी कमी करा" असे म्हणालो असता, लोकसेवक मिरगणे मला "काहीतरी कमी करुन मिटवुन टाका ना तुकडा" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक मिरगणे मला "या मंगळवारी, मी सांगतो तसा मार्ग करा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "कस येऊ" अशी विचारणा केली तेंव्हा ते मला "आता संागीतल की" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती" अशी विचारले असता लोकसेवक

मिरगणे मला "आता काय बोललो मी... बघा" असे म्हणाले. तेंव्हा मी त्यांना "एक लाख" असे म्हणालो असता ते मला "हं" म्हणाले. त्यानंतर मी त्यांना पुन्हा लाचेची रक्कम कमी करण्याबाबत विंनती केली असता, त्यांनी मला "तुम्ही साहेबाला भेटा, तुमचा फायदा होईल" असे म्हणुन मला त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री.मोरे यांना भेटण्यास सांगीतले. त्यानंतर श्री.मिरगणे यांनी मला मंगळवारी दिनांक 25/11/2025 रोजी साहेब येणार आहेत असुन मंगळवारी दुपारी पुन्हा येण्यास सांगीतले, मी श्री.मिरगणे यांना पुन्हा "येताना किती घेऊन येऊ?" असे विचारले असता त्यांनी "तेवढच की.." असे लाचेच्या रकमेबाबत बोलले. कॅबिनच्या दरवाज्याच्या मध्यभागी काच असल्याने मी व लोकसेवक मिरगणे हे पंच क्रं 1 पाटील यांना स्पष्ट दिसत होतो व कॅबीनचा दरवाजा अर्धवट उघडा असल्याने पंच क्रं 1 पाटील हे आमचे दोघांमध्ये चालु असलेले संभाषण ए‍ैकत होते. पंच क्रं 1 पाटील यांना सदरबाबत विचारणा केली असता त्यांनी याचप्रमाणे हकिकत सांगीतली, त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ए‍ैकले असता ते तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेली हकीकतप्रमाणे खरे असल्याची खात्री केली.

एकंदरीत लोकसेवक मिरगणे यांनी तक्रारदार यांना त्यांचे वरीष्ठ श्री. मोरे यांना मंगळवारी भेटण्यास सांगुन मंगळवार दि. 25/11/2025 रोजी पैसे घेवुन येण्यास सांगुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे पडताळणीमध्ये निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार संजय हरीराम सोगटे, पंच व पथकास गोपनियतेबाबत सुचना देऊन दिनांक 25/11/2025 रोजी सकाळी 09.00 वा हजर राहण्याच्या सुचना दिल्या व सदरचे मेमरीकार्ड पंचासमक्ष सिल केले. याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

दि. 25/11/2025 रोजी तक्रारदार संजय हरीराम सोगटे, पंच व पथक लाप्रवि, पुणे सकाळी 9.30 वा आमचे कार्यालयात हजर झाले. व दिनांक 21/11/2025 रोजी लोकसेवक मिरगणे यांनी त्यांचे वरीष्ठ मोरे साहेब, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांना भेटण्याबाबत सांगीतल्याने त्यांचेकडे पडताळणी कारवाई ही आमचे कक्षामध्‍ुनच करण्याचे आम्ही ठरविले. दि. 21/11/2025 रोजी पंचासमक्ष सिल केलेले मेमरीकार्ड सलग वापरण्याचे आम्ही ठरविले. त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांचे पडताळणी कारवाई करीताचे निवेदन 11.05 वा ध्वनीमुद्रीत करण्यात आले. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह दुचाकी क्रं एमएच 12 यु व्हि 0586 वरुन 11.26 वा रवाना केले. काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 पाटिल हे लाप्रवि, पुणे कार्यालयातील आमचे कक्षात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार सा‍ेगटे यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 13.24 वा.ची होती. आम्ही तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, "मी व पंच क्रं 1 पाटील असे पंच क्रं 2 यांचे दुचाकी वाहन क्रं एमएच 12 यु व्हि 0586 यावरुन शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे गेलो. लोकसेवक मोरे यांना भेटण्यास आलेल्या नागरीकांची मोठया प्रमाणात गर्दी असल्याने मी व पंच त्यांचे केबीनच्या बाहेर थांबुन राहिलो. मी सदर ठिकाणच्या नोंदवहीमध्ये माझे नावाची नोंद करुन थांबुन राहीलो. लोकसेवक मोरे यांना भेटण्यासाठी मोठया प्रमाणात गर्दी असल्याने व दुपारच्या जेवणाची वेळ झाल्याने मी व पंच सदर ठिकाणाहुन निघुन दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आल्याचे तक्रारदार यांनी पंच क्रं 2 यं‍ाचे समक्ष सांगीतली. ती वेळ होती 13.24 वाजेची. दुपारच्या जेवणानंतर पुन्हा श्री.गणपत मोरे, विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे पडताळणी करण्याचे आम्ही ठरविले.

त्यानंतर आम्ही पुन्हा 14.31 वा व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार सोगटे यांचे शर्टच्या आतमध्ये बनियनला लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्रं 1 यांचेसह दुचाकी वाहनावरुन वभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात रवाना केले. त्यानंतर काहीवेळात तक्रारदार व पंच क्रं 1 पाटील हे लाप्रवि, पुणे कार्यालयातील आमचे कक्षात आले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकार्डर बंद करुन ताब्यात घेतला ती वेळ 15.25 वा. ची होती. त्यानंतर तक्रारदार यांना पंच क्रं 2 यांचेसमक्ष पडताळणी कारवाईकरीता गेल्यापासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी सांगीतले की, "मी व पंच क्रं 1 पाटील असे पंच क्रं 2 यांचे दुचाकी वाहन क्रं एमएच 12 यु व्हि 0586 यावरुन शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे गेलो. आम्ही शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लोकसेवक मोरे यांचे केबीनजवळ गेलो. त्यावेळी त्यांचे कॅबिनमध्ये जाणेकरीता काही नागरीक उपस्थित होते. काहीवेळाने मी व पंच पाटील असे लोकसेवक मोरे यांचे केबीनमध्ये गेलो. त्यावेळी लोकसेवक मोरे त्यांचे कार्यालयातील लिपीक श्री शिंदे व ईतर 7 – 8 लोक त्यांचे कामासाठी तेथे उपस्थित होते. मी लोकसेवक मोरे यांचे केबीनमध्ये गेलेनंतर "सेवार्थ आयडी माया सदकाळेच दिल होत, ई सेवावर पाठवल होत, मिरगणे साहेब म्हणले, तुम्हाला भेटा." असे म्हणालो. त्यावर लोकसेवक मला "ते बंद हाय ओ, हे काय हे, ई ऑफिसच बंद आहे, त्याच्यामुळच काम करता येईना ही काय, ई ऑफिस फाईल" असे म्हणाले. त्यावेळी मी तेथेच

थांबुन राहिलो. त्यानंतर मोरे साहेब व त्यांचे कार्यालयातील उपस्थित असलेले ईतर नागरीक व त्यांचे कार्यालयातील कर्मचारी यांचेमध्ये चर्चा सुरु होती. त्यावेळी मोरे साहेब यांनी त्यांनाही ई ऑफिस बंद असलेबाबत सांगितले. त्यावेळी मी मोरे साहेब यांना "साहेब, मी थांबु का बाहेर" असे विचारले. त्यावेळी ते मला "ते ई ऑफिस चालु झाल्याशिवाय काहीच नाही" असे म्हणाले. त्यानंतर आम्ही त्यांचे कक्षातुन बाहेर आलो. श्री. गणपत मोरे, शिक्षण उपसंचालक यांनी माझेकडे पैश्याबाबत कोणताही विषय न घेतल्याने मी व पंच क्रं 1 पाटील असे लोकसेवक मिरगणे साहेब यांना भेटण्यास त्यांचे कक्षाजवळ गेलो असता मिरगणे साहेबांनी मला थांबण्यास सांगितले, मी त्यांचे केबीनच्या बाहेर थांबलो. परंतु मिरगणे साहेब यांनी मला बराचवेळ आत न बोलाविल्याने मी तेथुन निघुन पंच पाटील यांचेसोबत दुचाकी वाहनावरुन लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आल्याचे पंच क्रं 2 यांचे समक्ष सं◌ागीतले.

एकंदरीत लोकसेवक मोरे, विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी कोणत्याही प्रकारे लाचेची मागणी न केल्याने व दिनांक 21/11/2025 रोजी लोकसेवक श्री. मिरगणे यांनी मागणी केलेल्या लाचेच्या अनुषंगाने श्री.मिरगणे यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे आम्ही ठरविले. सापळा पथकामध्ये नव्याने सामील झालेल्या पोलीस उप अधिक्षक वाळके व पोहवा 3296 बाळासाहेब गदादे तसेच शासकीय वाहन इर्टीगा क्रं एमएच 12 युसी 4109 व त्यावरील चालक श्रेणी पोलीस उप निरीक्षक दामोदर जाधव यांचे सोबत आम्ही पंच व तक्रारदार यांची ओळख करुन दिली व तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने आजपावेतो झालेल्या कारवाईबाबत सर्वांना थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार सोगटे यांना आम्हा पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेबाबत विचारले असता, त्यांनी लोकसेवक श्री.मिरगणे यांनी मागणी केलेल्या 01 लाख रुपये लाच रक्कमेपैकी 50,000/-(भारतीय चलनातील रु.500/- दराच्या एकुण 100 नोटा) इतकी रक्कम काढून ती त्यांचे वैयक्तिक बचतीतुन आणली असल्याचे तक्रारदार सोगटे यांनी आम्हास सांगितले. लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे संपुर्ण रक्कम तक्रारदार सोगटे यांचेकडे नसल्याने सदर रकमेमध्ये खेळण्यामधील 500/- रुपये दराच्या एकुण 100 बनावट नोटा ठेवण्याचे आम्ही ठरविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/-रुपये दराच्या 100 चलनी नोटांचे नंबर एका को-या कागदावर पंच क्र.2 श्री सय्यद यांचे मदतीने लिहून घेवून त्यावर आम्ही व पंचांनी समक्ष म्हणून सह्या केल्या. सदर कागद पंच क्र.2 सय्यद यांचे ताब्यात देऊन लोकसेवकाकडून लाच रक्कम हस्तगत केलेनंतर सदर नोटांचे नंबर व कागदावरील लिहलेले नंबर यांची खात्री करावी अशी सुचना आम्ही दिली.

सापळापुर्व कारवाई लाप्रवि, पुणे कार्यालयामधुनच करण्याचे ठरविल्याने व मनुष्यबळ कमी असल्याने लाप्रवि, पुणे कार्यालयातील हजर असलेल्या मपोहवा 8060 साका यांना आम्ही सदर कारवाई मध्ये सामील करुन घेतले व पंच व तक्रारदार यांना अँथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगण्यास सांगितले. आमचे सुचनेनुसार मपोहवा/साका यांनी आमचे कार्यालयात दोन्ही पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा व अँथ्रासिन पावडर दाखवून कार्यवाहीतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सं◌ागितले. लोकसेवक मिरगणे यांना संशय येईल म्हणुन सदरची रक्कम एका खाकी रंगाच्या पाकिटामध्ये देण्याचे आम्ही ठरविले. त्यानंतर मपोहवा/साका यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/-रु. दराच्या 100 भारतीय चलनी नोटा, 100 खेळण्यातील बनावट नोटा व खाकी पाकिट प्रथम नेहमीच्या प्रकाशात व नंतर अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासुन दाखविले असता त्या नोटांवर व पाकिटावर कसलीही चकाकी दिसुन आली नाही त्या नोटा व ते पाकिट नेहमी सारखेच दिसले. त्यानंतर आमचे सुचनेवरुन मपोहवा/साका यांनी 500/-रु. दराच्या 100 भारतीय चलनी नोटा, 100 बनावट नोटा व खाकी पाकीट एका कागदावर ठेवून त्या नोटांच्या दोन्ही बाजुस व पाकिटाच्या दोन्ही बाजुस कापसाच्या बोळ्याने क्रमा-क्रमाने अ◌ॅथ्रासिन पावडर लावली. व त्यानंतर लाप्रवि कार्यालयातील आमचे केबीनमध्ये कृत्रीम अंधार केला असता मपोहवा/साका यांचे हातातील नोटांवर व खाकी पाकिटावर अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या सर्व नोटांवर व खाकी पाकिटावर दोन्ही बाजुस अ◌ॅथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली. तशीच चकाकी मपोहवा/साका यांच्या दोन्ही हातं◌ाच्या बोटावर देखील दिसुन आली. त्यानंतर पोनि लोणारे यांचे कार्यालयात पुन्हा उजेड करण्यात आला.

आमचे सुचनेनुसार पोहवा/साका यांनी त्या नोटा खाकी पाकिटामध्ये ठेवुन तक्रारदार श्री. संजय सोगटे यांच्या पँटच्या पुढील उजव्या खिशांत ठेवल्या व त्यानंतर मपोहवा/साका यांना ठरल्याप्रमाणे पथकातुन वगळण्यात आले. त्यानंतर लाप्रवि कार्यालयात कृत्रीम अंधारामध्ये तक्रारदार यांचे हात व कपडे अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याचे प्रकाशात तपासुन पहाता फक्त त्यांचे अंगातील राखाडी रंगाच्या पँटच्या पुढील उजव्या खिशाच्या आतील भागास लाचेची रक्कम ठेवलेल्या ठिकाणी अ◌ॅथ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर आम्ही पंचाना, तक्रारदार सोगटे यांना पुढील सापळा कारवाई ही सलग असल्याने पडताळणी कारवाईदरम्यान वापरण्यात आलेले मेमरीकार्ड हेच पुढील सापळा कारवाईकरीता सलग वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये प्रथम तक्रारदार सोगटे व त्यानंतर पंच क्र.1 श्री पाटील व पंच क्रं 2 श्री सय्यद

यांचे सापळा निवेदने 16.16 वा. ध्वनीमुद्रित केली. त्यानंतर आम्ही दिलेल्या सुचनांची उजळणी करून दिली व तक्रारदार यांना लाच रक्कम स्विकारलेनंतर इशारा म्हणुन त्यांचे डोक्यावरील टोपी डावे हाताने काढुन इशारा देण्यास सांगीतले. त्यानंतर आम्ही व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या आतमधील बनियनला लावला व तक्रारदार व पंच क्र.1 यांना दुचाकी वाहन एमएच 12 यु व्हि 0586 ने शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या दिशेने रवाना केले ती वेळ 16.53 वाजेची, त्यानंतर लागलीच आम्ही पोलीस उप अधीक्षक सतीश वाळके, सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र.2 असे शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 याने शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या दिशेने रवाना झालो व शासकीय वाहन बॅनर्जी चौकाचे पुर्वी थांबवून चालक सोडून सर्व वाहनातुन उतरून पायी चालत तक्रारदार व पंच क्र.1 हे यांचे आधी शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या आवारामध्ये कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने सापळा लावुन थांबले. लागलीच पाठोपाठ तक्रारदार व पंच क्र.1 हे त्यांचे दुचाकी वाहनाने शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या मेन गेटने आत येवून वाहन पार्क करुन शिक्षण उपसंचालक कार्यालयात गेले. त्यानंतर काही वेळात तक्रारदार सोगटे हे मिरगणे यांचे कक्षातुन बाहेर आले व त्यांनी त्यांचे डोक्यावरील टोपी काढुन ठरल्याप्रमाणे लाच रक्कम स्वीकालेबाबत पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच पोलीस उप अधीक्षक वाळके, आम्ही, व सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र.2 असे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लोकसेवक मिरगणे यांचे कक्षाचे दिशेने जावून पोशि ठाकुर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद केला ती वेळ 18.21 वा.ची होती. त्यानंतर संपुर्ण पथक लोकसेवक मिरगणे यांचे कक्षामध्ये जात असताना त्यांचे कक्षामध्ये इतर 3 इसम लोकसेवक मिरगणे यांचे कक्षामध्ये आले. त्यावेळी आम्ही नमुद इसमांना लोकसेवक मिरगणे यांचे कक्षामध्ये थांबुन राहणेबाबत सुचना दिली. त्यानंतर आम्ही पंचांसमक्ष तक्रारदार श्री. सोगटे यांना लोकसेवक मिरगणे यांचे कक्षामध्ये बोलावून लाच रक्कम कोणी स्वीकारली अशी विचारणा करता, तक्रारदार यांनी तेथील उभ्या असलेल्या इसमाकडे बोटाने इशारा केला व तेच लोकसेवक मिरगणे असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना कक्षाच्या बाहेर थांबण्याबाबत सुचना दिली. त्यावेळी पोशि ठाकुर यांनी लोकसेवकाचे डावा हात व पोलीस उप अधिक्षक वाळके हे उजवा हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना थांबवुन ठेवले ती वेळ होती 18.22 ची. त्यावेळी पोहवा गदादे यांनी त्यांचेकडील मोबाईलमध्ये व्हीडीओ शुटींग चालु करून चित्रिकरण चालु केले. आम्ही लोकसेवक मिरगणे यांना स्वत:ची ओळख सांगुन त्यांचेविरुध्द झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली व त्यांचा पुर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रावसाहेब भागवत मिरगणे वय 57 वर्षे, पद – शिक्षण उप निरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे रा. ग्रिन व्हिल, डिपी रोड, ए2- 808, मावळा हॉटेलजवळ, हडपसर, पुणे असे सांगितले. आम्ही लोकसेवक मिरगणे यांना तक्रारदार सोगटे यांचेकडून स्वीकारलेली लाच रक्कम कोठे ठेवली अशी विचारणा करता लोकसेवक मिरगणे यांनी त्यांचे टेबलवरील काळया रंगाच्या हॅण्डबॅगमध्ये लाच रक्कम ठेवली असल्याचे सांगुन लोकसेवक मिरगणे यांनी त्यांचे उजव्या हाताने बॅगमधील लाच रक्कम काढून आमचे समक्ष हजर केली. त्यानंतर आमचे सुचनेवरून पंच क्र.2 यांनी सदर लाच रक्कम त्यांचे ताब्यात घेतली व त्यांचेकडील नोटांचा नंबर लिहलेला कागद बाहेर काढून त्यावरील लिहलेले नंबर व नोटांवरील नंबर यांची पाहणी केली असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर पंचासमक्ष मिरगणे यांचे कक्षामध्ये कृत्रीम अंधार केला असता त्यांचे उजवे हातास व त्यांचे काळया रंगाच्या हॅण्डबॅगेच्या दोन नंबरच्या कप्प्याच्या तोंडास व आतील बाजुस निळसर चकाकी दिसुन आली.
या सर्व घटनेचे पोहवा गदादे यांचेकडील मोबाईलद्वारे व्हीडीओ चित्रिकरण करण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही लोकसेवक मिरगणे यांचेकडे तक्रारदार यांच्या पत्नीच्या शालार्थ आयडीच्याबाबत असलेल्या कागदपत्रांबाबत विचारणा करता त्यांनी सदरचे कागदपत्रे हे कार्यालयातील श्री तळेकर, मुख्य लिपीक यांचेकडे असल्याचे सांगीतले. त्यावेळी आम्ही लोकसेवक मिरगणे यांना त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेबाबत विचारणा करता त्यांनी त्यांचे वरिष्ठ अधिकारी श्री गणपत मोरे, विभागीय शिक्षण उपसंचालक हे असल्याचे सांगीतले. त्यावेळी आम्ही यांनी गणपत मोरे यांना फोन करुन झाले कारवाईबाबत थोडक्यात माहिती देऊन तक्रारदार यांचे पत्नीचे शालार्थ आयडी संदर्भातील कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदरची कागदपत्रे लाप्रवि,पुणे कार्यालयात सादर करीत असलेबाबत सांगीतले. त्यानंतर पुढील कारवाई हि लाप्रवि, पुणे कार्यालयात जावुन करण्याचे ठरविण्यात आलेने लोकसेवक मिरगणे यांना ताब्यात घेऊन त्यावेळी संपुर्ण पथक शासकीय वाहनाने लाप्रवि, पुणे कार्यालयात परत आले. पंच क्रं 1 व तक्रारदार हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने लाप्रवि,पुणे कार्यालयात परत आले.

आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र 1 असे दुचाकी वाहनाने शिक्षण उपसंचालक कार्यालयात गेलो त्यानंतर मी, पंच क्र 1 श्री पाटील यांचेसह शिक्षण उपसंचालक कार्यालयामधील लोकसेवक मिरगणे यांचे कक्षाजवळ जाऊन थांबलो. त्यावेळी लोकसेवक मिरगणे त्यांचे कक्षामध्ये उपस्थित नव्हते. काहीवेळाने लोकसेवक मिरगणे हे त्यांचे कक्षामध्ये आले.

त्यावेळी लोकसेवक मिरगणे यांना भेटण्यासाठी 7 ते 8 नागरीक त्यांचे कक्षाचे बाहेर उपस्थित होते. लोकसेवक मिरगणे हे त्यांचे कक्षात आल्याने मी व पंच पाटील असे लागलीच त्यांचे कक्षामध्ये गेलो. त्यावेळी त्यांचे कक्षामध्ये आगोदरपासुनच एक इसम उपस्थित होता. मी व पंच पाटील लोकसेवक मिरगणे यांचे केबीनमध्ये गेल्यानंतर लोकसेवक मिरगणे यांनी सदर इसमास बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यानंतर लोकसेवक मिरगणे मला "काय बोला, पटकन बोला, तुमच, दार पुढ करा" असे म्हणाले त्यावेळी मी त्यांचे कक्षाचा दरवाजा बंद केला व लोकसेवक मिरगणे यांनी मला "आज थांबता का तुम्ही, ई ऑफिस बंद ए" असे म्हणाले. त्यावेळी लोकसेवक मिरगणे यांनी मला "किती आणले?" अशी विचारणा केली त्यावेळी मी त्यांना "एक लाख" असे म्हणालो. त्यावेळी त्यांनी त्यांची काळया रंगाची हॅण्डबॅग माझ्या समोर धरली व मला "टाका हयात" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "हयाच्यात" असे म्हणालो त्यावर लोकसेवक मला "लवकर लवकर" असे म्हणाले. त्यावेळी मी माझ्या पँटच्या पुढील उजव्या खिशातुन लाच रकमेचे पाकिट माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचे काळया रंगाच्या हॅण्डबॅगमध्ये ठेवले. त्यावेळी लोकसेवक मिरगणे मला "बघु मी करुन घेतो, जावा तुम्ही, मी उदया व्हॉटसअॅपवर पाठवतो, मला मिस कॉल दया, माझा नंबर आहे का तुमच्याकड?" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "नाही" असे म्हणालो असता लोकसेवक मिरगणे मला "घ्या नंबर" असे म्हणुन मला त्यांनी त्यांचा मोबाईल नंबर दिला. त्यावेळी मी त्यांना "मोजुन घ्या, हया दोस्तांकडन आणलेत" असे पंचांकडे इशारा करत बोललो त्यावर लोकसेवक मिरगणे मला "नाय आता वेळ नाही, जावा तुम्ही" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ठिक आहे" असे म्हणुन सदर ठिकाणाहुन निघत असताना मी माझे मोबाईलवरुन लोकसेवक मिरगणे यांचे मोबाईलवर कॉल केला. त्यावेळी लोकसेवक मिरगणे यांचे मोबाईलवर रिंग गेल्याने त्यांनी मला "हयो तुमचाय का नंबर" अशी विचारणा केली. त्यावर मी त्यांना "हा" असे म्हणुन त्यांचे कक्षाच्या बाहेर आलो. त्यावेळी लोकसेवक मिरगणे यांचे कक्षाच्या बाहेर थांबलेल्या इसमाने मला परत बोलावील्याने मी पुन्हा लोकसेवक मिरगणे यांचे कक्षात गेलो. त्यावेळी लोकसेवक मिरगणे यांनी माझ्या पत्नीच्या शालार्थ आयडीबाबत माझ्याकडे चौकशी केली. त्यानंतर मी पुन्हा त्यांचे कक्षाच्या बाहेर निघुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला अशी हकिकत दोन्ही पंचासमक्ष सांगीतली. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी दिनांक 17/11/2025 रोजी तक्रारदार श्री. संजय हरीराम सोगटे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 21/11/2025 रोजीच्या झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांच्या पत्नीचा शालार्थ आयडी मंजुर करुन देण्यासाठी यातील लोकसेवक रावसाहेब भागवत मिरगणे, शिक्षण उपनिरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे यांनी स्वता:साठी व त्यांचे वरीष्ठांसाठी एक लाख रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन दिनांक 25/11/2025 रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील स्व:ताचे कक्षामध्ये पंचासमक्ष एक लाख रुपये लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी श्री. रावसाहेब भागवत मिरगणे, शिक्षण उपनिरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7,7(अ), प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Santosh Laxman Pandhre(I (Inspector)) / DGPSLPM7301 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

एस.एच.ओ./ठाणे अंमलदार

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Santosh Laxman Pa

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): DGPSLPM7301